# ‘जितो’ चेअरमनपदी संजय घोडावत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्रसिद्ध उद्योजक व संजय घोडावत



विद्यापीठाचे अध्यक्ष संजय घोडावत यांची नुकतीच जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन अर्थातच ‘जितो’ या जागतिक संस्थेच्या चेअरमनपदी निवड झाली.

जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन ही एक व्यावसायिक, उद्योजक व शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींची जागतिक संघटना आहे. सामाजिक-आर्थिक सक्षमीकरण, मूल्य आधारित शिक्षण, समाजाचे कल्याण, करुणा निर्माण करणे, जागतिक मैत्रीचा प्रसार आणि अध्यात्मिक उन्नती ही या संघटनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. समाजातील उपेक्षित घटकांना मदत करणे हे या संस्थेचे प्रमुख ध्येय आहे.

उद्योजक घोडावत यांनी तब्बल ३० वर्षांहून अधिक काळ उद्योग क्षेत्रात केलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल ही निवड करण्यात आली आहे. उद्योग क्षेत्रातील प्रगतीबरोबरच त्यांनी शिक्षण क्षेत्रात ही मोठे योगदान दिले आहे. त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यामध्ये स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केले आहे. याठिकाणी १३००० हून जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या निवडीबाबत उद्योजक घोडावत म्हणाले, माझ्या कारकिर्दीमध्ये ही निवड माझ्यासाठी अतिशय मोलाची आहे. या संस्थेच्या माध्यमातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक तसेच औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन. या माध्यमातून माझ्या हातून सत्कार्य घडत आहे, हा माझ्या जीवनातील एक अनमोल ठेवा असल्याचे ते म्हणाले. या निवडीमुळे त्यांचे सर्वच स्तरावरून अभिनंदन होत आहे.